# दिनांक 01/04/2025

1 रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 31/03/2025 रोजी 00:00 वा च्या सुमारास मौजे जाताडे गावचे हददीत सावळा ते वावेघर रस्त्यावर जाताडे वळणावर डाव्या बाजुस ता.पनवेल येथे एक अनोळखी इसम वय अंदाजे 35 ते 40 वर्ष याने आपले ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच 46 वाय 1326 ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अतिवेगाने चालवून रस्त्याच्या बाजुला असलेल्या झाडाला ठोकर मारुन स्वतःच्या लहान मोठया दुखापती होण्यास तसेच स्वतःचे मरणास कारणीभूत झाला.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.75/2025, BNS 106(1),281,125(a),125(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री माळी हे करीत आहेत.

2. अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 31/03/2025 रोजी 15:30 वा च्या सुमारास मौजे थळबाजारपेठ रस्त्यावर जगे यांचे घरासमोर ता.अलिबाग येथे महिला फिर्यादी रा.थळ बाजार, पो.थळ ता.अलिबाग या मच्छिसाठी बर्फ घेवुन घराकडे येत असताना थळबाजारपेठ रस्त्यावर जगे यांचे घरासमोर आलेवेळी आरोपी रा.थळ बाजार ता.अलिबाग हा फिर्यादी यांच्या मागे आला व फिर्यादी यांची साडी ओढुन अशलिल बोलुन अंगाला हात लावुन फिर्यादी यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.58/2025, भारतीय न्याय संहिता 2023 74,75, 76,79 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई श्रीम.मधुमती शिंदे हे करीत आहेत.

3. कर्जत ठाणे हद्दीत दिनांक 30/03/2025 रोजी 19:30 वा च्या सुमारास मौजे भालीवडी, पो.गौळवाडी येथील फिर्यादी यांचे घरासमोर येथे फिर्यादी व आरोपीत हे एकमेकांचे परिचयाचे असून एकाच गावातील राहणारे आहेत. आरोपी हे मराठा समाजाचे असून फिर्यादी अनुसूचित जातीतील नव बौध्द समाजाचे असल्याचे त्यांना चांगल्या प्रकारे माहिती असताना देखील फिर्यादी यांच्या कुटूंबाला घर क्र.191 व सभोवताली असलेल्या वहिवाटीतील मोकळया जागेतून निष्कादीत करून हकलून देण्याच्या उददेशाने तसेच मनात भिती निर्माण करण्याच्या उददेशाने दि.30/03/2025 रोजी 19.30 वा.चे.सुमारास आरोपीत क्र.1 ते 7 यांनी फिर्यादी यांना काहीएक न विचारता त्यांचे संमतीशिवाय त्यांचे घरात घूसूनृ तु आमच्यावरती खूप कंम्लेटी करतो हया म्हारडयांच्या जास्त मस्ती आहे, यांचा माज मोडा, याला जाम मस्ती आहे याची मस्ती जिरवा असे जातीवाचक शब्द उच्चारून फिर्यादी यांना हाताबुक्याने मारहाण केली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.94/2025,भा.न्या.संहिता कलम-189(2),191(2) 115(2),352,351(2) सह अनुसुचित जाती जमाती कायदा कलम-3(1) (आर) (एस) ,3(2) (व्हीए),3(1) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सो.कर्जत श्री.धुळा टेळे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 31.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 283 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,93,950/-रुपये इतका दंड आकारला आहे.